# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७

ई-मेलः election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in


## विद्यापीठ निवडणूक- २०२२

## जाहीर सूचना

**दि. १३-१२-२०२२ रोजी मतमोजणीकरिता उपस्थित राहण्यासाठी 'उमेदवार' किंवा 'उमेदवाराचा प्रतिनिधी' असल्याचे लेखी पत्र सादर करण्याबाबत**

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठाच्या अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळ प्राधिकरणासाठी दि. १०-१२-२०२२ रोजी विद्यापीठाने निश्चित केलेल्या १७ मतदान केंद्रावर निवडणूक घेण्यात आली आहे.

एकरूप परिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार कळविण्यात येते की, अधिसभा, विद्यापरिषद आणि अभ्यासमंडळ निवडणुकीच्या मतमोजणीवेळी 'उमेदवार' किंवा 'उमेदवाराचा प्रतिनिधी' उपस्थित राहू शकतो.

करिता, 'उमेदवार' किंवा 'उमेदवाराने प्राधिकृत केलेला प्रतिनिधी' नावाचा विहित नमुन्यातील अर्ज फोटो व आधारकार्डसह दि. १२-१२-२०२२ रोजी दु. ०१.०० वाजेपर्यंत निवडणूक विभागास सादर करावा.

उमेदवार एकतर स्वतः उपस्थित राहू शकेल, किंवा त्याच्या अनुपस्थितीत त्याचा प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल. याशिवाय अधिकची ओळखपत्र/ बॅज दिले जाणार नाही.

सदरील मुदतीनंतर आलेल्या अर्जदारांचा मतमोजणीवेळी उपस्थित राहण्यासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

विहित मुदतीत अर्ज सादर केलेल्यांनी दि. १३-१२-२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. मतदान कक्षाबाहेर स्वाक्षरी घेऊन ओळखपत्र/ बॅज वितरित केले जातील.

संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०२२/ )(
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
दिनांक- १०-१२-२०२२ )(

**कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

दि. ---------------------

प्रति,

| |
|---|
| **फोटो** |

**मा. कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी,**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

विषयः- **दि. १३-१२-२०२२ रोजी मतमोजणीसाठी हजर राहण्याबाबत.**

महोदय,

दि. १३-१२-२०२२ रोजी विविध प्राधिकरणाच्या (विभागप्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विद्यापीठ अध्यापक, अध्यापक- अधिसभा, अध्यापक- विद्यापरिषद,) निवडणुकीची मतमोजणी प्रक्रिया केली जाणार आहे.

त्याअनुषंगाने मतमोजणीस हजर राहण्यासाठी मी स्वतः उपस्थित राहील किंवा माझा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित राहील.

उमेदवाराचे नावः- --------------------------------------- स्वाक्षरी-

**किंवा**

प्रतिनिधीचे नावः- ------------------------------------- स्वाक्षरी-

प्राधिकरणाचे नावः- ---------------------------------

सोबतः- आधारकार्ड/मतदान ओळखपत्र/ओळखीचा वैध पुरावा, २ फोटो (एका फोटोमागे नाव लिहावे)

**उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी**